(राज्य निवडणूक आयोगाच्या क्र.रानिआ/जिपस-२०२५/प्र.क्र.२९/का.७/दि.०१/१०/२०२५ रोजीच्या आदेशासोबतचे सहपत्र)

**परिशिष्ट-१३ (ब)**

**पंचायत समिती अंतिम आरक्षणाबाबतची अधिसूचना**

**जा.क्र.२०२५/सा.शा./जि.प.पं.स/सा.प्र./कावी-२०० दि. ३१/१०/२०२५**

ज्याअर्थी; राज्य शासनाकडील क्रमांक **जिपनि-२०२५/प्र.क्र./३६/पं.रा.२ दिनांक १२/०६/२०२५** रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या प्रभाग रचना कार्यक्रमानुसार **फुलंब्री** पंचायत समितीच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीकरिता ०८ निर्वाचक गणांच्या भौगोलिक सिमा क्र. जा.क्र.२०२५/सा.शा./जिपपंस/सां.प्र./कावी-५० दिनांक १२/०८/२०२५ च्या अधिसूचनेन्वये शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत;

आणि ज्याअर्थी; महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील तरतुदी अन्वये आणि राज्य निवडणूक आयोगाकडील क्रमांक **रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.२९/का-७ दिनांक ०१/१०/२०२५** आदेशान्वये **फुलंब्री** पंचायत समिती मधील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासप्रवर्ग व स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासप्रवर्ग व स्त्रियांसह) राखून ठेवावयाच्या जागा निश्चित केल्या आहेत;

आणि ज्याअर्थी; राज्य निवडणूक आयोगाच्या क्रमांक **रानिआ/जिपस-२०२५/प्र.क्र.३०/का-७ दि. ०१/१०/२०२५** आदेशान्वये पंचायत समिती निर्वाचक गणाच्या आरक्षण सोडतीनंतर त्याची अंतिमरित्या प्रसिद्धी करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रदान केले असून सदर आदेशान्वये दिलेल्या कार्यक्रमानूसार **फुलंब्री** पंचायत समितीमधील आरक्षित निर्वाचक गणांची जाहीर सोडत दि. १३/१०/२०२५ रोजी काढण्यात आली व निवडणूक विभागनिहाय आरक्षण प्रसिद्ध करून त्यावर दि. १४/१०/२०२५ ते १७/१०/ २०२५ या कालावधीत हरकती व सूचना मागविण्यात आल्या. सदर प्राप्त हरकती व सूचनांवरील अभिप्राय विचारात घेऊन राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक **रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.२९/का-७ दिनांक ०१/१०/२०२५** अन्वये **फुलंब्री** पंचायत समितीमधील निर्वाचक गणाच्या आरक्षणास मा. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी मान्यता दिली आहे;

आणि त्याअर्थी; राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचना क्रमांक **रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.२९/का-७ दिनांक ०१/१०/ २०२५** अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून मी **जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर** याद्वारे **फुलंब्री** पंचायत समितीच्या संदर्भात शासन राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या निर्वाचक गणामध्ये पुढील सार्वत्रिक निवडणूकीच्या प्रयोजनार्थ खालीलप्रमाणे आरक्षण अधिसूचित करीत आहे.

**फुलंब्री पंचायत समितीमधील एकूण जागांचा तपशील**

| अ.क्र. | प्रवर्ग | एकूण जागांची संख्या | पैकी महिलांकरिता आरक्षित जागा |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | ०१ | ०१ |
| २ | अनुसूचित जमाती | ०० | ०० |
| ३ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | ०२ | ०१ |
| ४ | सर्वसाधारण | ०५ | ०२ |
| | **एकूण** | **०८** | **०४** |

फुलंब्री पंचायत समितीमधील निर्वाचक गण निहाय आरक्षणाचा तपशील

| अ.क्र. | तालुका | निवडणूक विभाग क्रमांक व नाव | निर्वाचक गणाचा क्रमांक व नांव | आरक्षण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | |
| १ | फुलंब्री | २१-बाबरा | ४१-बाबरा | सर्वसाधारण |
| | | | ४२-खामगांव | सर्वसाधारण महिला |
| | | २२-वडोद बाजार | ४३-वडोद बाजार | नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| | | | ४४-तळेगाव | नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला |
| | | २३-पाल | ४५-जातेगाव | सर्वसाधारण |
| | | | ४६-पाल | सर्वसाधारण महिला |
| | | २४-गणोरी | ४७-वानेगाव | अनुसूचित जाती महिला |
| | | | ४८-गणोरी | सर्वसाधारण |

ठिकाण : छत्रपती संभाजीनगर
दिनांक : ०३/११/२०२५

दिलीप स्वामी (भा.प्र.से)
जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर

जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर